जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२७९/२०२१

प्रेसनोट

दिनांक - १६ /०१ /२०२१

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन. तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

चाकण एमआयडीसी मोठी असल्याने मुंबईकडुन चाकणकडे जाणारी वाहने ही तळेगाव शहरातुन जातात त्याच प्रमाणे नाशिक व अहमदनगर कडुन तळेगाव एमआयडीसीकरीता येणारी वाहतुक ही देखील तळेगाव शहरातुन जात असते. तळेगाव स्टेशन चौकातुन अंदाजे २० फुट रुंदीचा रेल्वेपुल असल्याने त्या ठिकाणी एकावेळी ०२ वाहने जावु शकतात सदरचा भाग हा वर्दळीचा आहे. त्याच प्रमाणे यापुर्वी सदर रस्त्यावर फेटल अपघात होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला होता. तरी खालील नमुद रस्त्यावर सर्व अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त, वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.१८/ ०१ /२०२१ ते दि.०१ / ०२/२०२१ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करून अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येईल.

<u>देहूरोड वाहतुक विभाग अंतर्गत</u>

- इंदोरी जुना टोल नाका ते वडगाव फाटयाकडे जाणारी व वडगाव फाटयाकडुन इंदोरी जुना टोलनाका कडे जाणारी सर्व अवजड वाहनांना (सहा पेक्षा अधिक चाकांचा जड व अजवड वाहनांना) सकाळी ०७.०० ते १९.०० वा. पावेतो प्रवेश बंद करण्यात येत आहे. फक्त १४.०० ते १६.०० वा दरम्यान स्थानीक अवजड वाहतूक (सहा पेक्षा अधिक चाकांचा जड व अजवड वाहनांना) सोडण्यात यावी
- पर्यायी मार्ग :- सर्व वाहनांना जुना इंदोरी टोल नाका मागील गायरान मध्ये वाहन पार्किंग करता येईल.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे देहूरोड तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत जाणा-या सर्व अवजड वाहनांना सकाळी ०७.०० ते १९.०० वा पावेतो प्रवेश बंदी करणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

Shiremath
सुधीर हिरेमठ (भा.पो.से)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून,सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी <u>देहूरोड- तळेगाव</u> वाहतुक विभाग

४) कार्यकारी अधिकारी, तळेगाव नगरपरिषद, तळेगाव व इंदोरी ग्रामपंचायत, इंदोरी

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.